**नियमित दिवाणी मुकदमा क्र.७९/१९९४ मधील नि.क्र.१४७ वरील आदेश**

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त जमीन मिळकतीत प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये अशी ताकीद मिळणेसाठी आणि केलेले बांधकाम व तारेचे कुंपण काढुन टाकण्यासाठी आज्ञार्थी ताकीद हुकूम होवून मिळणेसाठी, तसेच वादग्रस्त जमीन मिळकतीचा कब्जा दरम्यानचे उत्पन्नासह मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांनी वादींतर्फे कुलअखत्यार याने दाखल केलेले पुराव्याचे शपथपत्र वादींचा जबाब म्हणुन वाचण्यात येवू नये, पुरावा सादर झाला नसल्याने दावा फेटाळण्यात यावा अथवा वादीचा पुरावा बंद करुन प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रकरण लावण्यात यावे, इत्यादी मागण्यांसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील प्रस्तुत प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादींतर्फे नि.क्र.१३९ वर अर्ज सादर करुन वादींतर्फे दाखल करण्यात आलेल्या नि.क्र.८७ वरील पुराव्याच्या शपथपत्रावर हरकती उपस्थित करण्यात आलेल्या होत्या. त्यावर वादींतर्फे आणखी वेगळे शपथपत्र दाखल करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन होवून सदर पहिले शपथपत्र ‘Not pressed’ समजावे अशा स्वरुपाचे प्रतिपादन करण्यात आले होते. नि.क्र.१३९ वर ‘filed’ असा आदेश झालेला आहे. तथापि वादींतर्फे पुन्हा त्याच व्यक्तीचे दि.१४/०१/२०१६ रोजी काही बेकायदेशीर बदल करुन शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. वास्तविक अशी कायद्यात तरतुद नसल्याने ते शपथपत्र पुराव्याचेकामी वाचता येणार नाही. यावरुनच संधी मिळुनही वादीचा पुरावा दाव्यात दाखल नाही हे स्पष्ट होते. पुरावा नसल्याकारणाने दावा खर्चासह खारीज होण्यास पात्र ठरतो. सबब, प्रस्तुतचा दावा फेटाळण्यात यावा अथवा वादीचा पुरावा बंद करुन प्रतिवादींतर्फे पुराव्यासाठी प्रकरण नेमण्यात यावे. तसेच अखत्यारपत्रधारकाला मुळ वादी म्हणुन पुरावा देता येत नाही असे नामदार सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले असल्याने वादीतर्फे कुलअखत्यार याने दाखल केलेले पुराव्याचे शपथपत्र पुराव्याच्याकामी वादींचा जबाब म्हणुन वाचता येणार नाही. इत्यादी सर्व बाबी नमुद करुन अर्ज मंजूर करण्याची विंनती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

०३ वादींनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. वादींतर्फे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज कायद्यातील तरतुदीस धरुन नाही. वादींचा साक्षीदार हा वादी क्र.०१ चा मुलगा असुन वादग्रस्त मिळकती हया वादी कुटूंबियांच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. त्यामुळे वादींच्या साक्षीदाराचा देखील

हक्क व हिस्सा आहे. सदर साक्षीदारास वादग्रस्त मिळकतींची सर्व माहीती असल्याने त्या आधारे सदर साक्षीदार आपली साक्ष देत आहे. प्रतिवादी हे नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयातील निर्देशाचा चुकीचा अर्थ लावत आहेत. वादींनी मौखिक पुरावा दिलेला असल्यामुळे दावा काढून टाकता येणार नाही. त्यामुळे अर्ज फेटाळणेत यावा. इत्यादी सर्व बाबी नमुद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

०४. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले. उभयपक्षकारांतर्फे केलेला संपुर्ण युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्वप्रथम नि.क्र.८७ वर वादींतर्फे कुलअखत्यारी शत्रुघ्न सहदेव राणे याचे साक्षीदार क्र.०१ म्हणुन सरतपासाचे शपथपत्र दाखल करण्यात आलेले होते. त्यावर माझ्या पुर्वाधिका—यांनी दि.३१/०८/२००७ रोजी 'वाचुन नोंद घेण्यात आली' असा आदेश पारीत केला. तद्नंतर वादींतर्फे सदरील शपथपत्रावर 'प्रस्तुतच्या प्रतिज्ञापत्रात अनावधानाने टंकलेखनामध्ये काही तांत्रीक चुका झाल्या आहेत, त्यामुळे सदरचे प्रतिज्ञापत्र वादी आजरोजी Not pressed करीत आहेत व वादीतर्फे स्वतंत्र प्रतिज्ञापत्र सादर करणार आहेत त्यामुळे त्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत' असे लेखी नमुद करण्यात आल्यानंतर; माझ्या पुर्वाधिका—यांनी सदरील पुराव्याच्या शपथपत्रावर '...... Hence it is filed and shall not be read into the evidence' असा आदेश दि.१७/०८/२०१३ रोजी पारीत केला. तद्नंतर नि.क्र.१४५ वर याच साक्षीदाराचे म्हणजेच कुलअखत्यारी शत्रुघ्न सहदेव राणे याच्या पुराव्याचे शपथपत्र वादींनी दि.१४/०१/२०१६ रोजी दाखल केले व याच तारखेस माझ्या पुर्वाधिका—यांनी त्यावर Read and recorded असा आदेश पारीत केला.

०५. प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांनी सादर केलेल्या **जानकी भोजवानी विरुध्द इण्डसइण्ड बॅंक लिमीटेड, ए.आय.आर.२००५ सर्वोच्च न्यायालय ४३९** या न्यायनिवाडयातील वादतथ्यांचे व मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन केले. सदर न्यायनिवाडयामध्ये थोडक्यात खालीलप्रमाणे प्रमाणित करण्यात आले आहे:

> "Order III, Rules 1 and 2 CPC, empowers the holder of power of attorney to "act" on behalf of the principal. In our view the word "acts" employed in Order III, Rules 1 and 2, CPC, confines only in respect of "acts" done by the power of attorney holder in exercise of power granted by the instrument. The term "acts" would not include deposing in place and instead of the principal. In other words, if the power of attorney holder has rendered some "acts" in pursuance to power of attorney, he may depose for the principal in respect of such acts, but he cannot depose for the

> principal and not by him. Similarly, he cannot depose for the principal in respect of the matter which only the principal can have a personal knowledge and in respect of which the principal is entitled to be cross-examined."

वर नमुद न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे गृहीत धरण्यात आले आहे की, कुलअखत्या—यास जर पक्षकाराच्या प्रकरणाबाबत वैयक्तिक ज्ञान नसेल तर वैयक्तिक माहीती असलेल्या पक्षकाराच्या बदल्यात अशा कुलअखत्यारास शपथेवर साक्ष देता येणार नाही अथवा त्यावर त्याची उलटतपासणी होवू शकणार नाही.

०६. ही अभिलेखावरील बाब आहे की, नि.क्र.८७ वर वादीतर्फे कुलअखत्यार शत्रुघ्न सहदेव राणे याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन घेवून ते नंतर Not pressed करण्यात आल्यानंतर, पुन्हा त्याच साक्षीदाराच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१४५ वर वादींनी दाखल केलेले आहे. नि.क्र.१४५ वर शपथपत्रात काही विशिष्ठ बाबी वादींतर्फे नमुद करण्यात आलेल्या आहेत असे सकृतदर्शनी दिसुन येते. तथापि, दि.१४/०१/२०१६ रोजी माझ्या पुर्वाधिका—यांनी सदरील सरतपासाचे शपथपत्र वाचुन नोंदविले असा आदेश पारीत करतेवेळी प्रतिवादींनी आक्षेप घेतला होता असे अभिलेख पहाता दिसुन येत नाही. सदरील सरतपासाचे शपथपत्रात साक्षीदार क्र.०१ शत्रुघ्न याने दाव्यात नमुद केलेल्या सर्व घटनाक्रम, अतिक्रमण, बांधकाम, तारेचे कुंपण वगैरे गोष्टी व्यक्तीशः पाहीलेल्या आहेत व सर्व वस्तुस्थितीची त्यास व्यक्तीशः माहीती आहे असे शपथेवर त्याने कथन केलेले आहे. यावरुनच सदरील साक्षीदार हा त्यास दाव्याच्या संदर्भाने असलेल्या वैयक्तिक माहीती/ज्ञानापोटी तो साक्ष देवू इच्छित आहे असे प्रथमदर्शनी दिसते. जर प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार सदरील साक्षीदारास तसे कोणतेही वैयक्तिक ज्ञान अथवा वैयक्तिक माहीती त्यास नाही तर सदरील साक्षीदाराची उलटतपासणी घेवून तशा बाबी अभिलेखावर आणण्याची कायद्याने त्यांना पुरेपूर मुभा आहे. अशा परिस्थितीत नि.क्र.१४५ वरील पुरावा हा रद्दबातल आहे असे म्हणता येणार नाही. तसेच प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे सदरील अखत्यारपत्रधारकास पुरावा देता येणार नाही असे देखील म्हणता येणार नाही कारण वर नमुद साक्षीदाराने दाव्यातील सर्व घटनाक्रमांबाबत त्यास वैयक्तिक ज्ञान असल्याचे विशिष्टपणे नमुद केलेले आहे. अशा परिस्थितीत दावा खर्चासह मुळीच खारीज करता येणार नाही. सदर साक्षीदाराने नि.क्र.१४५ वरील सरतपासात शपथेवर केलेली कथने प्रतिवादींना उलटतपासणी घेण्याची संधी दिल्यावर गुणवत्तेवर तपासून पहावी लागणार आहेत. त्यामुळे वादीतर्फे पुरावा बंद करणेचा आदेश देणे न्यायोचीत होणार नाही.

सद्यस्थितीस अर्जामधील कथनांमध्ये तथ्य आढळत नसल्यामुळे अर्ज नामंजूर करावा लागेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

—:—**आ दे श**—:—

०१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वाक्षरीत/—

स्थळः— सावंतवाडी.
दिनांकः— ०६ सप्टेंबर, २०१६

( आर. आर. काळे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
सावंतवाडी.